अकोला जिल्हा

4/10/23

## १५०० अधिक लोकांनी जाणुन घेतली माहिती

# शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात सायबर सुरक्षा जागरूकता अभियान

मातृभूमि वृत्तसेवा

। अकोला, दि. ८।

स्थानिक शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात सायबर सुरक्षा अभियान राबविण्यात आले. भौतिकशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता कक्षाच्या वतीने आयोजन होते. महाराष्ट्र सायबर सेल मुंबई, क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि नासकॉम फाऊंडेशनचे सहकार्य होते.

यानिमित्त आयोजित पोस्टर्स स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. जगदीश साबू, अकोला सायबर सेलचे आशीष आमले, राहुल देवीकर यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेमध्ये १९३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आणि ९० पोस्टर्स तयार करून सादरीकरण केले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. नितीन सुरडकर, प्रा. रवी रेवस्कर यांनी केले. दिवसभरात



मोहरीदेवी खंडेलवाल, भिकमचंद खंडेलवाल, खंडेलवाल इंग्लिश स्कूल व इतर १५०० पेक्षा जास्त प्रेक्षकांनी सायबर सुरक्षेविषयी माहिती करून घेतली. स्पर्धेदरम्यान शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष डॉ. तारा हातवळणे, सचिव गोपाल खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. स्पर्धेमध्ये ऑनलाईन गुन्हे,ए.टी. एम., फिशिंग मेल, सोशल मीडिया द्वारे होणारे गन्हे, फेसबुक व बँकिंग गुन्हे, रोजगार विषयी फसवणूक, मट्रीमनी फ्रॉड, व्हाइस कॉलस्, वायफाय वरून होणारी ब्लॅकमेलिंग, फोटोमोर्फिंग अशा फसवणुकीपासून सुरक्षितता कशी बाळगावी यावरील पोस्टर्स विद्यार्थ्यांनी सादर केले. सर्वांना मोबाइल-इंटरनेटच्या योग्य वापरासाठी सुरक्षिततेची शपथ देण्यात आली. क्विक हिल मार्गदर्शिका डाऊनलोड करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले.

विद्यार्थी समन्वयक शीतल साखरे तथा सायबर वॉरियर्स यांनी राष्ट्रीय सायबर सुरक्षा जागृती महिना साजरा करण्यास उत्साहात सुरुवात केली. सायबर सुरक्षा जनजागृती अभियानचे समन्वयक डॉ. हरिदास खरात यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. यात यापूर्वी अकोला जिल्ह्यातील अनेक शाळेमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती अभियान राबविण्यात आले असून यावर्षी देखील ३५००० विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे असे सांगितले. अभियानांतर्गत क्विक हिल फाउंडेशनच्या सुगंधा दानी, अकोला सायबर सेलचे प्रशांत केदारे, स्वप्नील दामोधर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देवून २२ सायबर वॉरियर्सची निवड करण्यात आली. हे वॉरियर्स विविध ठिकाणी जावून विविध माध्यमाद्वारे सायबर सुरक्षा जागृतीचे कार्य करणार आहेत. अभियान यशस्वी करण्याकरिता प्राचार्य डॉ. जगदीश साबू, समन्वयक डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.